**वाचले** -१) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्र. एसएसएन-२१०३/(११३/०३)माशि/-२ दि. २७/११/२००६

२) दिनांक /१०/२०१५ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

माध्यमिक शिक्षण विभाग

क्र. माध्य/शि/३/कावि/१०४४/२०१५

दिनांक १७/१०/२०१५

**विषय** - माध्यमिक विद्यालयासाठी घड्याळी तासिका (CLOCK HOUR BASIS) मानधनावर शिक्षक नेमणूक करणेबाबत...

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माध्यमिक शिक्षण विभागाच्या वतीने मनपा परिसरात १८ माध्यमिक विद्यालय कार्यरत आहेत. या विद्यालायांमधून ८६३७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. माध्यमिक विद्यालयांच्या इयत्ता १० वी चा सरासरी निकाल, विद्यार्थ्यांना देण्यात आलेली बक्षिसे, व नैसर्गिक वाढ तत्वानुसार विद्यार्थी व तुकडी संख्येत वाढ होत असते. सध्या विद्यार्थी व तुकडी संख्यानुसार काही विषयांचे शिक्षक सेवानिवृत्ती, रजा इ. कारणास्तव शिक्षक कमी पडत आहेत. यास्तव आवश्यक ते विषयनिहाय नियमानुसार शिक्षक नेमणुका करणेस कालावधी लागणार आहे. तथापी मुख्याध्यापक यांनी वेळोवेळी केलेल्या शिक्षक मागणीस्तव मनपा माध्यमिक विद्यालयांमधील इयत्ता ८ वी ते १० वी चे विद्यार्थीचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून खालील विद्यालयात तात्पुरत्या कालावधीसाठी विषयनिहाय घड्याळी तासिका मानधनावर शिक्षक नेमणूक करणे आवश्यक आहे. उपरोक्त १ अन्वयेचे शासन निर्णयानुसार घड्याळी तासिका शिक्षक नेमणूक करणेची तरतुद आहे.

| अ.क्र | विद्यालयाचे नाव | कमी शिक्षक | विषय |
|---|---|---|---|
| १ | माध्यमिक विद्यालय भोसरी | ४ | हिंदी - १<br>इंग्रजी - १<br>समाजशास्त्र - १<br>ए.टी.डी. - १ |
| २ | माध्यमिक विद्यालय काळभोरनगर | २ | विज्ञान - १<br>मराठी / भूगोल - १ |
| ३ | माध्यमिक विद्यालय पिंपळेसौदागर | १ | बी.एस्सी.बी.एड - १ |
| ४ | माध्यमिक विद्यालय नेहरुनगर | ४ | मराठी - २<br>समाजशास्त्र - २ |
| ५ | माध्यमिक विद्यालय फुगेवाडी | २ | मराठी - १<br>समाजशास्त्र - १ |
| ६ | माध्यमिक विद्यालय थेरगाव | ४ | बी.एस्सी.बी.एड - ३<br>ए.टी.डी. व शा.शि - १ |
| ७ | माध्यमिक विद्यालय आकुर्डी | ३ | उर्दू<br>बी.ए.बी.एड. - १<br>बी.एस्सी.बी.एड - २ |

| अ.क्र | विद्यालयाचे नाव | कमी शिक्षक | विषय |
|---|---|---|---|
| ८ | माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव | ४ | मराठी - २<br>इंग्रजी - १<br>बी.पी.एड. - १ |
| ९ | माध्यमिक विद्यालय वाकड | ५ | बी. एस्सी. - १<br>इंग्रजी - १<br>मराठी - १<br>समाजशास्त्र - २ |
| १० | माध्यमिक विद्यालय रुपीनगर | १ | बी.एस्सी.बी.एड - १ |
| ११ | माध्यमिक विद्यालय लांडेवाडी | १ | हिंदी - १ |
| | एकूण | **३१** | |

सबब, मी अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८ या आदेशान्वये उपरोक्त वाचले १ चे शासन निर्णय अन्वये वरील १ ते ११ माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापकांना विषयनिहाय शिक्षकांची घड्याळी तासिकेवर खालील अटी व शर्तीनुसार नेमणुका करणेस व मानधन अदा करणेस मान्यता देत आहे.

**<u>अटी व शर्ती -</u>**

**१.** उपरोक्त १ ते ११ विद्यालयातील मुख्याध्यापक यांनी आवश्यक त्या विषयनिहाय शिक्षकांची नेमणूक नियमानुसार करावी. आवश्यकता नसताना उपरोक्त प्रमाणे शिक्षकांची नेमणूका झाल्यास व त्या संबधीची संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील व नियुक्त शिक्षकास दिलेले मानधन वसूल करणेत येईल.

**२.** उपरोक्त वाचले १ अन्वयेचे शासन निर्णयानुसार पदवीधर शिक्षकास र.रु. ५४/- प्रति घड्याळी तास इतका मानधन दर राहील.

**३.** नियुक्त घड्याळी तासिका शिक्षकास एकत्रित मासिक मानधन र.रु. ४,०००/- पेक्षा अधिक असणार नाही.

**४.** घड्याळी तासिका अभ्यासक्रमाचे नियोजन व वेळापत्रक अचूक करणेची दक्षता घेणे आवश्यक राहील.

**५.** दिनांक ३०/१२/२०१५ पर्यत माध्यमिक शिक्षण विभागाकडे अर्ज स्विकारले जातील

सही/-

**अतिरिक्त आयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८

प्रति,

मुख्याध्यापक

------------------ माध्यामिक विद्यालय

२/- शिक्षकांनी प्रत्यक्ष घेतलेल्या तासिकेनुसार व हजर दिवसांप्रमाणे मानधन अदा करण्याची दक्षता घ्यावी.

सही/-

**शिक्षणाधिकारी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८